राज्य / विभाग / जिल्हा ग्रंथालय संघ अनुदान , तसेच संशोधन संस्था यांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : मराग्र २००७ /(२९१/०७ )साशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : ३० मार्च २०१०

वाचा : १) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय संघ ( सहाय्यक अनुदानासाठी मान्यता देणे) नियम,१९७१ व सुधारित नियम १९७८.
२) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय संघ (अनुदानासाठी मान्यता (सुधारित)) नियम,१९८३
३)महाराष्ट्र ग्रंथालयांना (संशोधन आणि साहित्यिक परिसंस्थांची ग्रंथालये) सहायक अनुदानाकरिता मान्यता देण्याचे नियम १९७४
४) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र. ३४/योपुमा/०९-१०/१२८२६, दि.५/११/०९

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय संघ (सहाय्यक अनुदानासाठी मान्यता देणे) नियम १९७१ व सुधारित नियम १९७८ मध्ये प्रकरण चार, नियम क्र. १६ (१)(२) मधील तरतूदीनुसार राज्य ग्रंथालय संघास कमाल रु. २४,०००/- (रु. चोवीस हजार फक्त) परिरक्षण अनुदान व रु. २,०००/- (रु.दोन हजार फक्त) अधिवेशन अनुदान असे एकूण २६,०००/-(रु. सव्वीस हजार फक्त) मंजूर करण्यात येते.

तसेच विभाग ग्रंथालय संघास, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय संघ (अनुदानासाठी मान्यता) (सुधारित) नियम १९८३ मधील नियम १५ मधील तरतुदी नुसार कमाल रु. ३,०००/- (रु. तीन हजार फक्त) परिरक्षण अनुदान व रु. ७५०/- (रु. सातशे पन्नास फक्त) अधिवेशन अनुदान असे एकूण रु. ३,७५०/- (रु. तीन हजार सातशे पन्नास फक्त ) मंजूर करण्यात येते.

तसेच जिल्हा ग्रंथालय संघास, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय संघ (अनुदानासाठी मान्यता) नियम १९७१ मधील नियम १५ (१)(३) मधील तरतुदीनुसार कमाल रु. २,०००/- (रु. दोन हजार फक्त) परिरक्षण अनुदान व रु. ३०० /- (रु. तीनशे फक्त) अधिवेशन अनुदान असे एकूण रु. २,३००/- (रु. दोन हजार तीनशे फक्त) मंजूर करण्यात येते.

तसेच महाराष्ट्र ग्रंथालयांना (संशोधन आणि साहित्यिक परिसंस्थांची ग्रंथालये) सहाय्यक अनुदानाकरिता मान्यता देण्याचे नियम १९७४ मधील नियम क्र. ११ नुसार कमाल रु. २,५००/- (रु. दोन हजार पाचशे) अनुदान मंजूर करण्यात येते.

तथापि, संघ व संशोधन ग्रंथालयातील कर्मचा-यांचे वेतन, ग्रंथ व नियतकालिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली वाढ, प्रवास भाडे, घरपट्टी, फर्नीचर, लेखनसामग्रीवरील खर्च इ. बाबींवरील वाढलेला खर्च तसेच मागील २० ते २२ वर्षामध्ये या अनुदानांमध्ये वाढ झालेली नसल्यामुळे, राज्य / विभाग / जिल्हा ग्रंथालय संघांच्या परिरक्षण अनुदान आणि अधिवेशन अनुदानात तसेच संशोधन ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानात वाढ करुन, सुधारित एकत्रित अनुदान मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :** राज्य / विभाग / जिल्हा ग्रंथालय संघाच्या परिरक्षण अनुदान आणि अधिवेशन अनुदानात खाली नमूद केल्याप्रमाणे सुधारित एकत्रित अनुदानास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | नाव संख्या | सध्याचे अनुदान (परिरक्षण + अधिवेशन ) | सुधारित एकत्रित अनुदान |
|---|---|---|---|
| १. | राज्य ग्रंथालय संघ ०१ | रु. २६,०००/- (२४,००० + २,०००) | रु. १,५०,०००/- |
| २. | विभागीय ग्रंथालय संघ ०६ | रु.३,७५०/- (३,०००/- +७५०/-) | रु. ५०,०००/- |
| ३. | जिल्हा ग्रंथालय संघ ३३ | रु. २,३००/- (२,०००+३००) | रु. २५,०००/- |
| ४. | संशोधन संस्था ३६ | परिरक्षण अनुदान रु. २,५००/- | परिरक्षण अनुदान रु. १५,०००/- |

२. सदरचा खर्च हा " डब्ल्यू ४, २२०५- कला व संस्कृती, १०५-सार्वजनिक ग्रंथालये (०३) मध्यवर्ती जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य (०३)(०१) सहाय्यक अनुदाने (२२०५ ०२९ ८) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) " या लेखाशिर्षाखाली चालू वर्ष २००९-१० करिता उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात येईल.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ७३४/०९/व्यय-५, दिनांक ११/११/२००९ व १६८/१०, व्यय ५, दि. २९/३/२०१० तसेच ३०२/१०, अर्थसंकल्प ८, दि.३०/३/१० अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय शासनाचे WWW.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा संगणकीय सांकेतांक क्र. 20100330191746001असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

बा.ओ.हेमाडे

( बा. ओं. हेमाडे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १, मुंबई / २, नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई,/ २ नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग, व्यय-५ / निवडनस्ती साशि-५
राज्य / सर्व विभागीय / सर्व जिल्हा ग्रंथालय संघ / सर्व संशोधन संस्था (द्वारा संचालक, ग्रंथालय संचालनालय)